# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक २१३ वा गुरूवार दि.१३ फेब्रुवारी २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.



Bharat Chandak

SATYA ELECTRICALS

Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512

Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018

Email:satyaelectricals@rediffmail.com


## दिल्ली पराभवानंतर अस्तित्वाचे आव्हान; अरविंद केजरीवाल घेणार मोठा निर्णय

नवी दिल्ली : दिल्ली विधानसभा निवडणुकीत झालेल्या पराभवानंतर आम आदमी पक्षाचे संस्थापक अरविंद केजरीवाल त्यांच्या राजकीय अस्तित्वाच्या संकटाचा सामना करत आहेत. या संकटावर मात करण्यासाठी केजरीवाल राज्यसभेचा मार्ग निवडतील. यासाठी पंजाबमधून राज्यसभेवर निवडून आलेल्या कोणत्याही खासदाराला राजीनामा देण्यास पक्ष भाग पाडू शकतो. त्यानंतर केजरीवाल त्यांच्या जागी वरिष्ठ सभागृहात पोहोचतील.

अरविंद केजरीवाल आणि त्यांचे सहकारी कायदेशीर अडचणींना तोंड देत आहेत. भ्रष्टाचार आणि मनी लॉन्ड्रिंगच्या आरोपांची चौकशी अंमलबजावणी संचालनालय (ईडी) तसेच केंद्रीय अन्वेषण विभागा (सीबीआय) कडून केली जात आहे. या चौकशीमुळे केजरीवाल यांच्या अडचणी वाढणार आहेत. अशा परिस्थितीत, खासदार किंवा आमदार नसताना, तपासाची पकड वेगाने घट्ट होऊ शकते. केजरीवाल यांना अशीही भीती आहे की, त्यांना लोकप्रतिनिधी म्हणून मिळणाऱ्या फायद्यांपासून वंचित ठेवले जाऊ शकते. तपासाची व्याप्ती जसजशी वाढत जाईल तसतसे राजकीय हल्लेही तीव्र होतील. यामुळे केजरीवाल यांच्यासाठी आपले अस्तित्व टिकवणे हे एक आव्हान असेल. त्यामुळे केजरीवाल यांनाही अशा व्यासपीठाची गरज भासेल जिथून ते आपले विचार व्यक्त करू शकतील.



याशिवाय, विरोधी मित्रपक्षांचीही मदत घ्यावी लागेल. यासाठी त्यांना केंद्रीय राजकारणात आपले अस्तित्व टिकवावे लागेल. या अस्तित्वामुळे राज्यसभेत त्यांच्या संभाव्य प्रवेशाच्या आशा वाढू लागल्या आहेत. 'आप'च्या सूत्रांनी असे संकेत दिले आहेत की केजरीवाल आपला राजकीय प्रभाव टिकवून ठेवण्यासाठी वरिष्ठ सभागृहात जाऊ शकतात. आप नेत्याने सांगितले की, त्यांचे ध्येय लोकांची सेवा करणे आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री म्हणून नाही तर राज्यसभेचे खासदार म्हणून सध्या केजरीवाल यांच्या पक्षाकडे पंजाब विधानसभेतील ११७ जागांपैकी ९२ जागांचे बहुमत आहे. आपकडे सध्या राज्यसभेच्या १० जागा आहेत. त्यापैकी दिल्लीतून तीन आणि पंजाबमधून सात आहेत. दिल्लीच्या जागांची मुदत २०३० पर्यंत आहे, तर पंजाबच्या जागांचा कार्यकाळ २०२८ पर्यंत आहे. केजरीवाल यांना सामावून घेण्यासाठी आणि त्यांना सुरक्षित मार्ग देण्यासाठी त्यापैकी एका खासदाराला वरिष्ठ सभागृहाचा राजीनामा द्यावा लागेल.

तथापि, पंजाबच्या मुख्यमंत्रीपदासाठी केजरीवाल यांच्या नावाबद्दल बरीच राजकीय चर्चा सुरू आहे. पण यामुळे केजरीवाल यांना सहानुभूती मिळण्याऐवजी त्यांना सत्तेचे हौशी म्हणून घोषित टिकेचा सामना करावा लागेल. दिल्लीतील पराभवानंतर, केजरीवाल कोणताही राजकीयदृष्ट्या चुकीचा संदेश स्वीकारण्याच्या स्थितीत नाहीत. अशा परिस्थितीत राज्यसभा हा त्यांचा सर्वात सुरक्षित मार्ग असेल. या मार्गावर चालण्यासाठी केजरीवाल यांनी दिल्लीत पंजाबच्या आमदारांसोबत बैठक घेतली आहे.

## अशा प्रकारे तुम्ही एक परावलंबी वर्ग तयार करत नाही का?



लोकांना धान्य आणि पैसे मोफत मिळत राहिले तर त्यांना काम करण्याची इच्छाच राहणार नाही. त्यांना मोफत रेशन मिळत आहे आणि कोणतेही काम न करता पैसे मिळत आहेत. हे सांगणे दुःखद आहे; पण आपल्याला बेघर लोकांना मुख्य प्रवाहात सामिल करता येऊ शकत नाही का ? ते देशाच्या विकासात योगदान देऊ शकणार नाहीत. अशा मोफत योजना राबवून आम्ही एक परावलंबी वर्ग तयार करत आहोत का ?, अशा शब्दांमध्ये सरकारकडून राबविल्या जाणार्या मोफत योजनांवर आज (दि. १२) सर्वो च्च न्यायालयाने ताशेरे ओढले.

मोफत योजनांमुळे लोक परावलंबी होत आहेत

शहरी भागातील बेघर लोकांना आश्रय देण्यासाठी असलेल्या योजनांना फंड देणे बंद केल्या प्रकरणी दाखल याचिकेवर न्यायमूर्ती बी. आर. गवई आणि ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. खंडपीठाने स्पष्ट केले की, अशा मोफत योजनांमुळे लोक काम करण्याचे सोडून देतात. त्यामुळे लोक परावलंबी होत आहेत. न्यायमूर्ती गवई यांनी म्हणाले की, हे सांगताना खूप दुखः होते की आपल्याला बेघर लोकांना मुख्य प्रवाहात सामिल करता येऊ शकत नाही का ? ते देशाच्या विकासात योगदान देऊ शकणार नाहीत का? अशा मोफत योजना राबवून आम्ही एक परावलंबी वर्ग तयार करत आहोत का ?, असा सवाल करत सरकारच्या मोफत योजनांमुळे लोक काम करण्यास टाळाटाळ करताहेत. त्यांना कोणतेच काम न करता मोफत योजनांमुळे रेशन व पैसे मिळतात', असे ताशेरेही न्यायालयाने ओढले.

याचिकाकर्त्यांचे वकील प्रशांत भूषण यांनी युक्तिवाद करताना सांगितले की सरकारने शहरातील बेघर लोकांना आश्रय देण्यासाठी असलेल्या योजनांना फंड देणे बंद केले आहे. परिणामी यावर्षी देशभरात ७५० बेघर लोक थंडीने गारठून मेले. याचिकेत म्हटले आहे की, गरिबांना सरकारकडून प्राथमिकता न देता फक्त श्रीमतांची चिंता केली जाते; पण यावर नाराजी व्यक्त करताना न्यायालयाने म्हटले की,न्यायालयात राजकीय घोषणाबाजी करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

## करप्शन इंडेक्स जाहीर । डेन्मार्क भ्रष्टाचारमुक्त; मात्र जगातील दोन-तृतियांश देशात धुमाकूळ

नवी दिल्ली : वृत्तसंस्था जगातील सर्वात भ्रष्टाचारी देशांची यादी जाहीर करण्यात आली आहे. त्यानुसार जगातील तब्बल दोन तृतीयांश देशांत भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात होत असल्याचे समोर आले आहे. या क्रमवारीत भारताचे स्थान ९६ क्रमांकावर आहे. भारताला ३८ गुण मिळाले आहेत.

भ्रष्ट देशांची क्रमवारी जाहीर : दरम्यान, ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनलकडून करप्शन परसेप्शन इंडेक्स २०२४ ची क्रमवारी जारी केली आहे. भ्रष्टाचार धारणा निर्दे शांकात जगातील सर्वात भ्रष्ट आणि सर्वात इमानदार देशांची क्रमवारी जारी करण्यात येते. सार्वजनिक क्षेत्रातील भ्रष्टाचाराच्या पातळीच्या आधारे सीपीआय १८० देशांची क्रमवारी सादर करते.

देशांना ० ते १०० या दरम्यान गुण दिले जातात. ज्यामध्ये सर्वाधिक गुण मिळवणारा देश हा इमानदार देश असतो तर सर्वात कमी गुण मिळवणारा देश हा भ्रष्ट देश जाहीर केला जातो. ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनल बर्लिनने हा अहवाल प्रसिद्ध केला आहे. यामध्ये पाकिस्तानसहित भारताच्या काही देशांनी भ्रष्टाचारामध्ये आघाडी मिळवली आहे.



सीपीआय रिपोर्टनुसार, भ्रष्टाचाराचा स्तर हा चिंताजनक आहे. रिपोर्टमध्ये जगातील गंभीर भ्रष्टाचार समोर आले आहेत. दोन-तृतियांश देशांना ५० हून कमी गुण मिळाले आहेत. या देशांत जगातील ६.८ अब्ज लोक राहतात. जे जगाच्या लोकसंख्येच्या ८५ टक्के आहेत.

सुदान सर्वात भ्रष्ट देश : जगातील सर्वात भ्रष्टाचारी देश आहे सूदान. या देशाला केवळ ८ गुण मिळाले आहेत. या यादीत १८० क्रमांक मिळालेला देश आहे. त्यानंतर सोमालिया १७९ क्रमांक, व्हेनेझुएला १७८ क्रमांक, सिरिया १७७ क्रमांकावर आहे.

अत्यंत कमी भ्रष्टाचारी देश : सर्वात कमी ज्या देशात भ्रष्टाचार होतो अशा देशांमध्ये डेन्मार्कने सलग ७ व्या वर्षी अव्वल स्थान पटकावले आहे. सीपीआय प्रमाणे ९० गुण प्राप्त केले आहेत. दुस-या क्रमांकावर फिनलँड (८८) तिस-या कम्रांकावर सिंगापूर (८४) चौथ्या क्रमांकावर न्युझीलंड (८३), ८१ गुणांसहित लक्झेंबर्ग, नॉर्वे स्वित्झर्लंड संयुक्तरित्या पाचव्या स्थानावर आहेत.

भारत ९६ व्या क्रमांकावर!

भारत या यादीत ९६ क्रमांकावर आहे. भारताला ३८ गुण मिळाले आहेत. गेल्या वर्षी जाहीर झालेल्या यादीत भारत हा ९३ व्या क्रमांकावर होता. त्यामुळे ३ क्रमांकाने घसरण झाली आहे. आपल्या शेजारी देशांच्या यादीतील स्थानांचा विचार केल्यास पाकिस्तान २७ गुणांसहित थेट १३५ क्रमांकावर आहे. चीन ४२ गुणांसहित ७६ व्या क्रमांकावर आहे. बांगलादेश २३ गुणांसहित १५१ व्या स्थानावर आहे. श्रीलंका आणि अफगाणिस्तान अनुक्रमे १२१ आणि १६५ व्या स्थानावर आहेत.

## 'शरद पवारांच्या हस्ते बाळासाहेबांची शिवसेना फोडणाऱ्यांच्या सन्मानामुळे महाराष्ट्राला वेदना

नवी दिल्ली : ज्यांनी बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना अमित शाह यांच्या सहकार्याने फोडली, त्यांचा सन्मान शरद पवार करतात. यामुळे महाराष्ट्राला वेदना झाल्यात, असे म्हणत संजय राऊतांनी थेट शरद पवारांवर हल्ला चढवला आणि आपली नाराजी जाहीरपणे व्यक्त केली. तसेच दिल्लीतील साहित्य संमेलन म्हणजे राजकीय दलाली आहे. संघाचा आणि भाजपचा हा उपद्व्याप आहे. आयोजक इथे दलाली करायला आले आहेत का? असा प्रश्नही त्यांनी विचारला. त्यांना महाराष्ट्र माफ करणार नाही, असेही संजय राऊत म्हणाले. दरम्यान, ही केवळ माझी भूमिका नसून पक्षाची भूमिका म्हणून बोलत आहे, असे म्हणत एक प्रकारे उद्धव ठाकरे शरद पवारांवर नाराज आहेत, याबाबतचे सुतोवाच राऊतांनी केले.

मंगळवारी माजी मुख्यमंत्री आणि विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना महादजी शिंदे राष्ट्र गौरव पुरस्कार सरहद संस्थेच्या वतीने आणि शरद पवारांच्या हस्ते देण्यात आला. दिल्लीत होत असलेल्या सरहद, पुणे आयोजित ९८ व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने हा पुरस्कार देण्यात आला. या पार्श्वभूमीवर संजय राऊत यांनी शरद पवारांवर थेट नाराजी व्यक्त केली आणि संमेलनाला जाणार नसल्याचे स्पष्ट केले. साहित्य संमेलन आयोजकांनाही राऊतांनी काही खोचक प्रश्न विचारले.

शरद पवार यांच्याकडे चुकीची माहिती- संजय राऊत

संजय राऊत म्हणाले की, राज्यातील सरकार ज्यांनी पाडले, बेइमानी केली त्यांच्या कार्यक्रमाला शरद पवार यांनी जायला नको होते. ज्यांनी राज्याची वाट लावली, जे राज्याचे शत्रू आहे त्यांना असे पुरस्कार देण हे राज्याच्या स्वाभिमानाला धक्का लावणार आहे. राज्याच्या जनतेला हे पटले नाही. काही गोष्टी राजकारणात टाळायला हव्या होत्या, तसेच ठाण्याच्या बाबतीत शरद पवार यांच्याकडे चुकीची माहिती आहे. ठाण्याचा विकास हा शिवसेनेने, सतीश प्रधान यांच्यासारख्या नेत्यांनी केला.

## शतकवीर रक्तदाते अनिल डुंगरवाल यांचे लग्नाच्या वाढदिवसाला १११ वे रक्तदान

लातूर :- जैन समाजातील युवा कार्यकर्ते अनिल फुलचंदजी डुंगरवाल यांनी आपल्या लग्नाच्या वाढ दिवसानिमित आपल्या जीवनातले १११ वे रक्तदान केले.भालचंद्र ब्लड बँकेत जाऊन त्यांनीआपल्या वयाच्या ५२ व्या वर्षी १११ वे रक्तदान करून एक नवा विक्रम प्रस्थापित केला आहे.या प्रसंगी त्यांच्या धर्मपत्नी आरती डुंगरवाल उपस्थित होत्या.अनिल ने आतापर्यंत अनेक गरजू रुग्णांना रक्तदान केले आहे.मानवतेच्या या राष्ट्रीय कार्यात त्यांनी स्वतः ला झोकून दिले आहे.त्यांनी अनेक संस्थांमार्फत आता पर्यंत जवळ जवळ १०० रक्तदान शिबिरे आयोजित करून अनेक युवकांना रक्तदान साठी प्रोत्साहित केले आहे.त्यांच्या या राष्ट्रीय कार्याची दखल घेऊन अनेक





संस्थांनी त्यांना सन्मानित केले आहे.आज लग्नाच्या वाढदिवसाबद्दल त्यांनी जैन गोरक्षणला देणगी प्रदान केली असून त्या ठिकाणी उभयतांनी आपल्या हस्ते गायीला चारा भरवला. रक्तदानच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल लातूर अर्बन बँकेचे संस्थापक अध्यक्ष प्रदीप राठी,विद्यमान अध्यक्ष आकाश राठी,श्री गुरु गणेश ग्रंथालयाचे सचिव तथा लालबहादूर शास्त्री गृहनिर्माण सोसायटीचे अध्यक्ष राजेश डुंगरवाल,भालचंद्र ब्लड बँकेचे सचिव विनोद कुचेरिया,सत्यनारायणजी करवा,सूर्यप्रकाशजी धूत,जैन समाज,मित्र परिवार व सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे

## अकोला जिल्ह्यातील लघुसिंचन योजना जलसाठ्यांची गणना करणार

अकोला : जिल्ह्यातील जलसाठे व लघु सिंचन योजनांची गणना करण्यासाठी जलसंधारण कार्यालयाकडून कार्यक्रम हाती घेण्यात आला असून, तालुकास्तरीय बैठका घेण्यात येत आहेत.

मृद व जलसंधारण विभागामार्फत लघु सिंचन योजनांची सातवी व जलसाठ्यांची दुसरी प्रगणना सुरू होत आहे. त्या अनुषंगाने तहसीलदार सुरेश कव्हळे यांच्या अध्यक्षतेखाली आज तालुकास्तरीय बैठक झाली. यावेळी उपविभागीय जलसंधारण अधिकारी सचिनकुमार वानरे, श्रीमती आर. व्ही. गिरीपुंजे, श्रीमती पी. एस. पंडे, सहायक महसूल अधिकारी श्रीमती पी. एस. पंडे आदी उपस्थित होते.



लघुसिंचन प्रकल्प व जलसाठ्यांच्या प्रगणनेसाठी जलसंपदा, मृद व जलसंधारण, कृषी, जि. प. लघुसिंचन, तसेच ग्रामस्तरावरील अधिकारी व कर्मचारी यांचे सहकार्य मिळवून कामाला वेग देण्याचे निर्देश कव्हळे यांनी दिले. प्रगणनेत दोन हजार हेक्टरपर्यंत क्षेत्र क्षमता असलेल्या लघुसिंचन योजना, छोटी धरणे, भूपृष्ठाखालील जलसाठ्याच्या वापरासाठीच्या योजना साध्या विहीरी, कूपनलिका, कालवे, बंधारे, विमोचक, बंद नलिका वितरण प्रणाली, उपसा सिंचन आदी सर्व बाबींचा समावेश आहे. अशी माहिती वानरे यांनी दिली.


दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

# इंडिया आघाडी धडा घेणार?

भाजपच्या अश्वमेधाने आपल्या विजयाची परंपरा कायम ठेवत आता दिल्ली काबीज केली आहे. हा निकाल विरोधी पक्षांना सतर्क करणारा आहे. इंडिया आघाडी यातून धडा घेणार काय?

आम आदमी पक्षाचा पराभव झाला असला तरी भाजप आणि आपच्या मतांच्या टक्केवारीमध्ये फारसा फरक नाही ही बाब लक्षात घेण्यासारखी आहे. भाजपला आपपेक्षा केवळ तीन टक्के मते जास्त मिळाली आहेत. आप आणि काँग्रेसने दिल्लीची निवडणूक एकत्र लढविली असती तर आपच्या किमान १५-२० जागा वाढल्या असत्या. या जागांवर आपचा पराभव झाला कारण काँग्रेसच्या उमेदवारांनी आपची मते आपल्याकडे ओढण्यात यश मिळविले. यामुळे इंडिया आघाडीने या निकालापासून धडा घ्यायला हवा.

आम आदमी पक्षाच्या पराभवात काँग्रेसने खूप मोठी भूमिका बजावली आहे. नवी दिल्ली मतदारसंघातून काँग्रेसने उमेदवार उभा केला नसता किंवा संदीप दीक्षित यांच्याऐवजी अन्य कुणाला उमेदवारी दिली असती तर अरविंद केजरीवाल यांचा नक्कीच पराभव झाला नसता. अरविंद केजरीवाल यांनी अण्णा हजारे यांना पुढे आणून 'इंडिया अगेन्स्ट करप्शन' नावाची एनजीओ स्थापन केली होती.

याच एनजीओच्या व्यासपीठावरून मनमोहन सिंग सरकार आणि शीला दीक्षित सरकारविरुद्ध भ्रष्टाचारविरोधी मोहीम छेडली. देशात वेगळे वातावरण तयार झाले आणि २०१३ मध्ये झालेल्या निवडणुकीत आपने दिल्लीतील १५ वर्षांचे शीला दीक्षित यांचे सरकार उलथवून लावले. 'इंडिया अगेन्स्ट करप्शन'च्या बॅनरखाली सुरू झालेली चळवळ यशस्वी झाल्यानंतर चळवळीतील लोकांनी एकत्र येऊन आम आदमी पक्षाची स्थापना केली आणि दिल्ली विधानसभेची निवडणूक लढली. अरविंद केजरीवाल यांनी त्यांची सामाजिक आभा निर्माण केली होती.

हा काळ एवढा भारावला होता की पहिल्याच निवडणुकीत २८ आमदार निवडून आलेत. यावरून असे दिसून येते की, आपने तेव्हा केवळ काँग्रेसच नव्हे तर भाजपच्या मतदारसंघातही आपला प्रभाव निर्माण केला होता. २०१३ मध्ये धर्मनिरपेक्षतेच्या नावाखाली 'आप'ने काँग्रेसच्याच पाठिंब्याने भाजपविरोधी आघाडी सरकार स्थापन केले होते. २०१५ मध्ये मध्यावधी निवडणूक झाली आणि आपने ६७ जागा जिंकत दिल्लीत नवीन इतिहास रचला. काँग्रेसचा पराभव झाला आणि मुस्लीम मतदारांनीसुद्धा आपला मतदान केले. यामुळे आपचा ऐतिहासिक विजय झाला.

काँग्रेसच्या काळातील भ्रष्टाचारांना जनता कंटाळली होती. यामुळे दलित, मागासवर्गीय आणि उच्च जातींव्यतिरिक्त, पूर्वांचल, उत्तराखंड तसेच दिल्लीतील पंजाबी-बनिया समाजानेसुद्धा आपला मतदान केले. याचा भाजपला जबरदस्त धक्का बसला. कारण भाजपने २०१४ची लोकसभा निवडणूक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली जिंकली होती. २०२०च्या दिल्ली विधानसभा निवडणुकीतही 'आप'ने विजय मिळविला. लोकप्रियता थोडी कमी झाली परंतु ती भाजप आणि काँग्रेसपेक्षा खूपच जास्त होती. यानंतर 'आप'ने पंजाबमध्ये काँग्रेसला आणि दिल्ली महानगरपालिका निवडणुकीत भाजपचा पराभव केला.

यापासून काँग्रेसने धडा घेतला नाही; पण भाजप मात्र सतर्क झाला. कारण अरविंद केजरीवाल यांनी उत्तर प्रदेश, गोवा, गुजरात, हिमाचल प्रदेश आणि हरियाणासह इतर राज्यांमध्ये आपला प्रभाव वाढवायला सुरुवात केली. २०२३ मध्ये 'आप'ला राष्ट्रीय पक्षाचा दर्जाही मिळाला. काँग्रेस, भाजप आणि जनता पक्ष, बसपा आणि माकपा यांसारख्या राष्ट्रीय पक्षांनंतर आप हा पहिला प्रादेशिक पक्ष होता ज्याला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळाला. शिवाय दिल्लीनंतर पंजाबमध्येही पूर्ण बहुमताचे सरकार स्थापन केले. यामुळे भाजप नेतृत्व सतर्क झाले आणि दिल्लीच्या उपराज्यपालांच्या माध्यमातून आप सरकारला घेरण्याची रणनीती आखली. कारण अरविंद केजरीवाल प्रत्येक बाबतीत उपराज्यपाल आणि पंतप्रधानांना लक्ष्य करायचे. दरम्यान, २०२४च्या निवडणुकीत काँग्रेसप्रणित इंडिया आघाडीत सामील होऊन आपने दिल्लीची निवडणूक लढली. काँग्रेसने चार तर आपने तीन जागा लढविल्या. मात्र, भाजपने सर्व सात जागा जिंकल्या.

पंजाबमध्ये लोकसभेच्याच निवडणुकीत काँग्रेस आणि आपने स्वतंत्र निवडणूक लढविली. यामध्ये काँग्रेसने 'आप'चा पराभव करीत दुप्पट जागा जिंकल्या. यानंतर आपने निर्णय घेतला की 'आप'ला वाढवायचे असेल तर काँग्रेसपासून दूर जावे लागेल. दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीत हे सूत्र अंमलात आले. पण भाजपने येथे दोन्ही पक्षाना पाणी पाजले.खरं तर, आम आदमी पक्षाचे विचार स्पष्ट आणि पारदर्शक होते.

मात्र, भाजपसोबत खटके उडायला सुरुवात झाल्यानंतर आपने रणनीती बदलली. अशातच, दारू घोटाळा उघडकीस आला. भाजपने याचा वापर एवढ्या शिताफीने केला की दिल्लीच्या जनतेला आप सरकार भ्रष्ट वाटू लागले. मद्य धोरणामुळे आपचे अनेक नेते तुरुंगात गेले. यात दस्तुरखुद्द केजरीवाल यांचाही समावेश होता. माजी उपमुख्यमंत्री, मंत्री आणि खासदार हेसुद्धा तुरूंगात गेले. यामुळे आपविरोधी वातावरण तयार झाले.

दुसरीकडे, भाजपने अरविंद केजरीवाल यांचे शीशमहाल, वायूप्रदूषण, यमुना जलप्रदूषण, दिल्लीतील काही भागांतील नरकमय परिस्थिती इत्यादींवर इतके लक्ष केंद्रित केले की लोकांना हे जाणवले की जोपर्यंत आप सत्तेत आहे तोपर्यंत दिल्लीचा विकास होऊ शकत नाही. याआधीही दिल्लीच्या विकासाचे सर्व श्रेय शीला दीक्षित सरकारला जाते. यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'आप'ला दिल्लीसाठी आपदा म्हटले. याचा मोठा परिणाम झाला. केजरीवाल सरकारने दिल्लीच्या लोकांना केंद्रीय योजनांच्या लाभापासून वंचित ठेवले, असा त्यांनी आरोप केला.



भाजपने दिल्लीच्या रस्त्यांवर 'आप'ला कोंडीत पकडण्यास सुरुवात केली तेव्हा परिस्थिती बदलली. छठपूजेविरुद्ध अरविंद केजरीवाल यांचे विचारही त्यांच्यावर ओझे ठरले. काँग्रेसविरुद्ध सपा, तृणमूल काँग्रेस, शिवसेना, यूटीबी इत्यादींचा पाठिंबा देखील 'आप'साठी महागात पडला. कारण आप मुस्लिमांना पाठिंबा देणारा पक्ष म्हणून ओळखला जाऊ लागला. दिल्ली दंगली, शाहीन बाग सारख्या निदर्शनांना आणि शेतकरी चळवळीसारख्या महानगरविरोधी चळवळींना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष पाठिंबा देणे देखील अरविंद केजरीवाल यांच्या राजकारणासाठी महागात पडले. खरे सांगायचे तर, भाजपने दिल्लीच्या राजकीय परिस्थितीवर मात करण्यासाठी एक सुनियोजित रणनीती आखली होती. हरियाणा ते महाराष्ट्रापर्यंतचे अनुभव एकत्र विणले गेले होते. मुख्यमंत्रिपदासाठी कोणत्याही व्यक्तीला चेहरा बनवण्याऐवजी, निवडणूक लढवा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नावाने मतदान करा, असे आवाहन त्यांनी लोकांना केले. त्याच वेळी, आप आणि काँग्रेसप्रमाणे मोफत भेटवस्तूंचा वर्षाव करणे हे भाजपसाठी चांगले ठरले. कारण लोकांनी मोदींच्या हमीला महत्त्व दिले. या निवडणुकीत सुरुवातीला मध्यमवर्गीय मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करणारे अरविंद केजरीवाल होते, परंतु मतदानापूर्वी मोदींनी त्यांच्या केंद्रीय अर्थसंकल्पाची जादू दाखवून निवडणुकीत विजय मिळवला.

## संपादकीय....

### महाराष्ट्राचे साहित्यतपस्वी प्राचार्य रा. रं. बोराडे

साहित्यविश्वात केवळ आपल्या लेखनकार्यात मग्न असणारे बहुतेक असतात; पण नवोदितांना सतत प्रेरणा व प्रोत्साहन देणारे लेखक फार कमी आढळतात. प्राचार्य बोराडे सर त्याला अपवाद होते. नव्या लेखकांचं लेखन वाचणं, त्यांना मार्गदर्शन करणं, त्यांच्यासाठी शिवार प्रतिष्ठान स्थापन करून नव्या आश्वासक लेखकांना गुणवत्तेनुसार पुरस्कार देणं हे कार्य बोराडे सरांनी अनेक वर्षं सातत्यानं केलं.

मराठी साहित्य प्रांतात आरंभकाळात गुणवत्तेचे, पण तरीही नागर भावविश्व मांडणारे साहित्य लिहिले जात असे. याचे कारणही हे होते की, खेड्यापाड्यात नि तळाच्या ग्रामीण महाराष्ट्रात उच्चशिक्षण पोहोचलेले नव्हते. पन्नास-साठच्या दशकात नि स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण महाराष्ट्रातील पहिली पिढी हळूहळू उच्चशिक्षणात यायला लागली नि माती आणि शेतीचा गंध मराठी साहित्यात प्रकट व्हायला सुरुवात झाली. पन्नास-साठ नि सत्तरच्या दशकाने मराठी साहित्याला नवे अवकाश दिले ते ग्रामीण व दलित साहित्याचे आणि त्याचबरोबर स्त्री साहित्याचे नवे दालनही मराठी साहित्याला समृद्ध करीत गेले. हे अनुभव विश्व मराठी साहित्याला नवी आशयघनता देते झाले, हे नक्की! ग्रामीण साहित्य नि ग्रामीण साहित्याची चळवळ जी घडत गेली, त्यात डॉ. आनंद यादव, शंकर पाटील, व्यंकटेश माडगुळकर नि मराठवाडा प्रदेशातील प्राचार्य रा. रं . बोराडे यांची नावे आपोआप नजरेसमोर येतात. रा. रं. बोराडे यांनी आपला असीम ठसा आपल्या आगळ्यावेगळ्या मराठवाडी भाषेने नि शैलीने निर्माण केला तो त्यांच्या लेखन गुणवत्तेने नि विशिष्ट आकृतिबंधाने..!


पूर्वीच्या उस्मानाबाद (धारशिव) नि आताच्या लातूर जिल्ह्यातील काटगाव हे आडवळणाचं अतिमागास खेडं आणि परिसर हे बोराडे यांचे अनुभवविश्व होते नि ते कधी साहित्याचा विषय बनू शकलेही नसते. २५ डिसेंबर १९४० ला जन्मलेल्या बोराडे यांना त्याकाळी शिक्षण घेणंही हिमालय चढून जाण्यागत दुरापास्त होते; परंतु या प्रतिभावान मुलाने आई-वडिलांच्या प्रेरणेने नि आपल्या जिद्दीने बार्शी व सोलापूर येथे शिक्षण पूर्ण केले. बार्शीला शिक्षणमहर्षी मामासाहेब जगदाळे यांनी गोरगरीब मुलांसाठी सुरू केलेल्या शाळेत ते शिकले. पदवी शिक्षण सोलापूरला दयानंद महाविद्यालय व विद्यापीठीय शिक्षण औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात पूर्ण केले. साहित्याची गोडी ही शालेय जीवनापासूनच होती. १९५७ मध्ये १७ वर्षांचे असताना रा. रं. बोराडे यांनी कथा स्पर्धेत भाग घेऊन त्यात आपली 'वसुली' ही वास्तववादी कथा पाठविण्याचे धाडस केले नि त्या कथेने पहिलं बक्षीस मिळवलेच; पण नवतरुण बोराडे यांना आत्मविश्वास दिला.

'सत्यकथा' या अतिशय प्रतिष्ठित वाङ्मयीन नियतकालिकाचे ते लेखक बनले. आपल्या लक्षवेधी बोली नि शैलीने त्यांनी महाराष्ट्र साहित्यविश्वाचं लक्ष वेधून घेतले. त्याचाच परिपाक म्हणून अतिशय नावाजलेल्या मौज प्रकाशनाने दूर मराठवाड्यातील या प्रतिभाशाली तरुण लेखकाचा पहिला कथासंग्रह 'मळणी' (१९६७) प्रकाशित केला. त्याला राज्य पुरस्कारही प्राप्त झाला . मराठी साहित्यविश्वात मग रा. रं. बोराडे यांनी आपली जागा निश्चित केली. सलग ५ पुस्तकांना राज्य पुरस्कार जिंकले. त्यांच्या कथासंग्रहांची नावे ही शेतीमातीतील, वैशिष्ट्यपूर्ण राहिली. 'मळणी', 'पेरणी', 'ताळमेळ', 'वाळवण', 'राखण', 'बोळवण', 'माळरान', 'वरात', 'बुरूज', 'कणसं आणि कडबा', 'खोळंबा', 'हेलकावे', 'फजितगाडा', 'नातीगोती', 'गोंधळ' या १५ कथासंग्रहांनी आपलं स्थान मराठी साहित्यात अढळ केलं. १९७१ मध्ये आलेली कादंबरी 'पाचोळा' हिनं मराठी साहित्यात व त्यातही ग्रामीण साहित्यात मैलाचा दगड बनली. त्यावर एमजीएम फिल्म विभागानं चित्रपटही केला. यामुळं रा. रं . बोराडे यांना 'पाचोळा'कार हे नामाभिधान मिळालं. 'आमदार सौभाग्यवती' ही त्यांची राजकीय कादंबरी फार गाजली. पुढे त्याचं त्यांनी नाट्यरूपांतरही केले व या नाटकाचे अनेक प्रयोग महाराष्ट्रभर झाले.

बोराडे सरांनी एकूण १५ कादंबर्या लिहिल्या. कथा, कादंबरी, नाटक, वैचारिक, बालसाहित्य नि समीक्षा या सर्व आकृतिबंधात त्यांनी लिलया लेखन केलं. विनोदी लेखनातही त्यांनी चांगलीच झेप घेतली. एक लेखक म्हणून १९५७ ते २०२२ पर्यंत अखंडपणे लेखनयज्ञ चालविला. पाच दशकांचा अखंड सर्जनशील निर्मितीचा हा प्रवास अचंबित करणारा आहे. मराठी साहित्यातील असे ते एकमेव साहित्यतपस्वी. नव्या पिढीचे प्रोत्साहक प्राचार्य बोराडे : मराठी साहित्य व संस्कृती मंडळाचे महाराष्ट्र सरकारने अध्यक्षपद दिल्यावर त्यांनी लक्षवेधी काम केले. 'महाराष्ट्राचे शिल्पकार' ही चरित्रमालिका हे त्याचे उत्तम उदाहरण होय. मराठी साहित्य व संस्कृती मंडळाची धूळ खात पडलेली हजारो पुस्तकं लोकांपर्यंत पोहोचविण्याचं बोराडे सरांचं काम लोकानुवर्ती होते. आपल्या तत्त्वाशी अशी निढळ निष्ठा जपणारे साहित्यिक विरळच. प्राचार्य बोराडे सर हे साहित्यकर्मींचा चालताबोलता आधारवड होता. सर्वांना उपलब्ध असणारा, कोणताही बडेजाव न ठेवणारा, साधा, सरळ नि अहंकाराचा लवलेश नसणारा ते एक माणुसकीचं अक्षर लेणं होतं, असं म्हणता येईल.

प्रभावी शैक्षणिक प्रशासक प्राचार्य बोराडे : रावसाहेब रंगराव बोराडे यांचा आणखी एक महत्त्वपूर्ण पैलू म्हणजे मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळातील त्यांची प्राध्यापकी व अडीच दशकांची प्राचार्य म्हणूनची वैजापूर, परभणी शिवाजी महाविद्यालय व औरंगाबाद येथील देवगिरी महाविद्यालयातील प्रभावी कारकिर्द. प्राचार्य बोराडे सर म्हणजे कला, संस्कृती, ज्ञान, साहित्य, विचार, समाज नि संशोधन यांचे ते कृतिवंत प्राचार्य होते. शेकडो प्राध्यापक नि हजारो विद्यार्थी यांचे ते प्रेरणास्थान राहिले. मराठवाडा प्रदेशाची सभ्यता, आतिथ्य, संस्कृतीचे ते सर्वात कार्यरत दूत होते. अशा या साहित्यतपस्वी व प्रभावी शैक्षणिक नेतृत्वाचे अक्षरलेणे अविस्मरणीय. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाने आपल्या एका महाविद्यालयास त्यांचे नाव देऊन चिरस्मारक करावे.

# फसवणूकखोर वाढताहेत... थोडं जपून!




मोबाईल फोनद्वारे दर मिनिटाला जगातील हजारो लोकांना फसवले जात आहे. सोशल नेटवर्कवर पोस्ट केलेले व्हिडीओ दाखविले जातात आणि ते वास्तव असल्याचे भासविले जाते. दुसरीकडे विकसित होत चाललेले नवे तंत्रज्ञान गैरव्यवहार करणार्या लोकांच्या गुन्ह्याची व्याप्ती वाढवत आहेत. डीपफेक, व्हॉईस क्लोन आणि एआय जनरेटेड फिशिंग स्कॅमची झलक आपण मागच्या वर्षात पाहिली आणि यात आणखी प्रकरणे वाढण्याची शक्यता आहे.

गेल्या काही दिवसांपासून आपण कोणालाही कॉल केला की, कानावर जनहितार्थ मेसेज पडतो. या संदेशात सायबर गुन्हेगारापासून सावध राहण्याची सूचना केली जाते आणि गरज भासल्यास १९३० या टोल फ्री क्रमांकावर फोन करून माहिती देण्याचे सांगितले जाते. सर्वच मंडळींना हा मेसेज ऐकवला जात आहे. कारण, सायबर गुन्ह्यांची वाढती व्याप्ती. डीपफेक, व्हॉईस क्लोन आणि एआय जनरेटेड फिशिंग स्कॅमची झलक आपण मागच्या वर्षात पाहिली आणि यात आणखी प्रकरणे वाढण्याची शक्यता आहे. 'डेलॉईट सेंटर फॉर फायनान्शियल सर्व्हिसेस'नुसार जनरेटिव्ह एआय २०२७ पर्यंत जगभरात ४० अब्ज डॉलरपर्यंत नुकसान करेल, असा अंदाज आहे. २०२३ मध्ये हे नुकसान १२.३ अब्ज डॉलर होते. म्हणजेच ३२ टक्के वार्षिक चक्रवाढ दरवाढ होय.

बिझनेस ई-मेलचे हल्ले : सायबर गुन्हेगार डीपफेकचा फायदा घेत बिझनेस ई-मेल हॅक करू शकतात. २०२४ मध्ये हॉगकाँगमध्ये दोन वेगवेगळ्या घटनांत ठकसेन लोकांनी एआय जनरेटेड व्हिडीओचा वापर केला आणि कर्मचार्यांना सुमारे ३० दशलक्ष डॉलरचा फंड ट्रान्स्फर करण्यासाठी तयार केले.

रोमान्स स्कॅम : नायजेरियातील एका प्रमुख सायबर गुन्हेगाराने अलीकडेच यूट्यूब चॅनेलवर एक व्हिडीओ पोस्ट केला. या धक्कादायक व्हिडीओत ऑटोमेटिक एआय चॅटबोट हा थेट जाळ्यात अडकलेल्या पीडितेशी चर्चा करताना दाखविला.

मेसेजचा भडिमार : मोबाईल फोनद्वारे दर मिनिटाला जगातील हजारो लोकांना फसवले जात आहे. सोशल मीडिया आणि टेलिग्रॅमवर पोस्ट केलेले व्हिडीओ दाखविले जातात आणि ते वास्तव असल्याचे भासविले जाते.

एआय डीपफेकमार्फत खंडणी वसुली : सिंगापूर येथे गैरव्यवहार करणार्या ठकसेनांनी कॅबिनेट मंत्र्यांसह तीस सरकारी संस्था, शंभर लोकप्रतिनिधींना टार्गेट करत डीपफेक मेलच्या मदतीने जबरदस्तीने खंडणी वसुलीचे कारस्थान रचले. यात त्यांचे अश्लील कृत्य दाखविले होते. पैसे दिले नाही, तर हा व्हिडीओ व्हायरल करत बदनाम केले जाईल, अशी धमकी दिली.

डीपफेक आर्थिक गुन्हा : एका अहवालानुसार, २०२४ मध्ये भारतात एक लाखापेक्षा अधिक डीपफेक डिजिटल अरेस्टची प्रकरणे घडली आहेत. सायबर सुरक्षातज्ज्ञांनी दिलेल्या इशार्यानुसार, आता पश्चिम देशात फसवणुकीचा मोठा ट्रेंड राहू शकतो. या गैरव्यवहारात ठकसेन ईडीचे अधिकारी असल्याचे भासवतात. ते खोटेनाटे कथानक रचून पीडितांवर मानसिक दबाव आणतात.

कसे ठेवाल स्वत:ला सुरक्षित? : तुम्ही अनोळखी संदेश, कॉल आणि मेलपासून सावध राहिले पाहिजे. आणीबाणीची परिस्थिती असल्याचे सांगणारे संदेश मनावर घेऊ नका. अर्थात, त्याची खातरजमा करूनच उत्तर द्यायला हवे. आपल्याला बँकेतून कॉल येत असेल आणि यात संवेदनशील माहिती मागितली जात असेल, तर फोन कट करा. ग्राहकसेवांवर बँकेला कॉल करा. कुटुंबातील एखादा सदस्य कॉल करून त्याचे अपहरण झाल्याचा दावा करत असेल किंवा तो कोठेतरी अडकल्याचे सांगत असेल, तर अशावेळी त्यालाच ठाऊक असणार्या गोष्टींबाबत प्रश्न विचारा. तज्ज्ञांच्या मते, कुटुंबातील सदस्यांसमवेत सेफ कोडवर्ड तयार करा. आणीबाणीचा कॉल किंवा मागणी केली जात असेल, तर त्या कोडवर्डचा वापर करून कॉलचा खरेपणा सिद्ध करता येईल किंवा पडताळणी केली जाईल.

# ॲसिडिटीवर नेहमी ‘ही’ गोळी घेत असाल तर त्याचा शरीरावर नेमका काय परिणाम होतो? डॉक्टर काय सांगतात, वाचा

ॲसिडिटी ही अनेकांना सातत्याने जाणवणारी एक समस्या आहे. पोटात गॅस्ट्रिक ग्लँड ॲसिडचे उत्पादन वाढल्याने ॲसिडिटीचा त्रास सुरू होतो. ज्यामुळे अपचन, छातीत जळजळणे, अन्ननलिकेत वेदना, पोटात अल्सर व जळजळ अशी लक्षणं दिसू लागतात. ही लक्षणं फारच त्रासदायक असतात, ज्यामुळे कामात मन लागत नाही. अशा वेळी ॲसिडिटीचा त्रास रोखण्यासाठी दर वेळी तुम्हीदेखील अँटासिड घेत असाल, तर ही सवय आजच थांबवा. कारण– त्यामुळे तुमच्या शरीरावर गंभीर परिणाम होत असतात. हे परिणाम नेमके काय? आणि ॲसिडिटीचा त्रास रोखायचा कसा, यावर डॉक्टरांचा सल्ला जाणून घेऊ

आम्लपित्त म्हणजेच ॲसिडिटीचा त्रास का होतो?



युटोपियन ड्रिंक्सच्या मुख्य आहार तज्ज्ञ डॉ. नंदिनी सरवटे यांनी सांगितले की, मसालेदार आणि चरबीयुक्त पदार्थ, कॅफिन व अल्कोहोल, अधिक खाणं, बैठी जीवनशैली, लठ्ठपणा, धूम्रपान, ताण यांसारख्या अनेक कारणांमुळे ॲसिडिटीचा त्रास होतो. ॲसिडिटीशी संबंधित समस्यांना तोंड देण्यासाठी जीवनशैलीत बदल करणे आणि संतुलित आहार घेणे गरजेचे आहे.

जेवणानंतर लगेच झोपल्याने त्याचा आरोग्यावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. त्यामुळे पोटातील अन्न अन्ननलिकेत जाऊ शकते, ज्यामुळे छातीत जळजळ, अपचन, बद्धकोष्ठता व गॅस्ट्रोएसोफेजियल रिफ्लक्स रोग (ऋएठऊ) यांसारख्या समस्या जाणवू शकतात.

ॲसिडिटीचा त्रास झाल्यास अँटासिड घ्यावी का?

ॲसिडिटीपासून आराम मिळावा म्हणून अँटासिड घेतल्याने तत्काळ आराम मिळू शकतो. परंतु, हे समजून घेणे आवश्यक आहे की, हा दीर्घकालीन उपाय असू शकत नाही. तुम्हाला त्यामुळे तात्पुरत्या प्रमाणात बरं वाटेल. त्याबाबत आहारतज्ज्ञ व डायबिटीज एज्युकेटर कनिका मल्होत्रा म्हणाल्या की, अँटासिड्स पोटातील आम्ल (ॲसिड) तात्पुरत्या प्रमाणात निष्क्रिय करते, ज्यामुळे छातीत जळजळणे व अस्वस्थता यांसारख्या लक्षणांपासून तात्पुरता आराम मिळतो. पण, ॲसिडिटी होण्यामागच्या मूळ कारणांवर आपण लक्ष देत नाही. या कारणांमध्ये आहाराबाबतच्या चुकीच्या सवयी, ताण, गॅस्ट्रोइसोफेजियल रिफ्लक्स रोग किंवा पेप्टिक अल्सर यासारखे गॅस्ट्रोइंटेस्टायनल विकार यांचा समावेश आहे,.

आहारतज्ज्ञ व डायबिटीज एज्युकेटर कनिका मल्होत्रा यांनी पुढे सांगितले की, ॲसिडिटी झाल्यानंतर तुम्ही दर वेळी अँटासिड्सवर अवलंबून राहत असाल, तर त्याचे तुमच्या शरीरावर दुष्परिणाम होऊ शकतात, ज्यामध्ये रिबाउंड ॲसिडिटी व संभाव्य पोषक घटकांचा अभाव या गोष्टींचा समावेश आहे. त्यामुळे लक्षणे ओळखून तुम्ही जीवनशैलीतील बदल करणे आणि संतुलित आहार वेळेवर घेणे गरजेचे आहे. ॲसिडचे उत्पादन कमी करणाऱ्या योग्य औषधांद्वारे तुम्ही ॲसिडिटीची मूळ कारणे ओळखून, त्यावर उपचार करणे अत्यंत आवश्यक आहे.

ॲसिटीडिटीचा त्रास रोखण्यासाठी काय उपाय करावेत?

दिल्लीच्या अपोलो स्पेक्ट्राच्या गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ. प्रीती जैन म्हणाल्या की, पचनक्रिया सुधारण्यासाठी झोपण्यापूर्वी दोन ते तीन तास आधी जेवा. जेवणानंतर लगेच झोपण्याऐवजी थोडे चाला. या सकारात्मक सवयींमुळे तुम्हाला पोटफुगी, गॅस व गॅस्ट्रोइंटेस्टायनल त्रासांपासून कमी–अधिक प्रमाणात आराम मिळेल.

# शरीर हायड्रेट ठेवण्यासाठी सकाळी उठल्यानंतर प्या ‘कोकम चीया सीड्स ज्युस’, पचनक्रिया राहील निरोगी

निरोगी आरोग्य ठेवण्यासाठी शरीर हायड्रेट असणे आवश्यक आहे . अन्यथा शरीराची पचनक्रिया बिघडण्याची शक्यता असते. कामाचा तणाव, आहारात सतत होणारे बदल, अपुरी झोप, मद्यपान, शरीरातील पाण्याची कमतरता इत्यादी अनेक गोष्टींचा परिणाम पचनक्रियेवर लगेच दिसून येतो. पचनक्रिया बिघडल्यानंतर शरीरातील विषारी घटक आतड्यांमध्ये तसेच साचून राहतात, जे आरोग्यासाठी अतिशय हानिकारक आहे. यामुळे त्वचेवर पिंपल्स मुरूम येणे, त्वचा निस्तेज होणे, फॅटी लिव्हर इत्यादी अनेक समस्या उद्भवण्याची शक्यता असते. त्यामुळे निरोगी आरोग्यासाठी सकाळी उठल्यानंतर शरीर हायड्रेट आणि स्वच्छ असणे आवश्यक आहे. आज आम्ही तुम्हाला शरीर हायड्रेट ठेवण्यासाठी कोकम चिया सीड्स ज्युस बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. या पेयाचे सेवन केल्यास शरीर हायड्रेट आणि फ्रेश राहील. कोकमच्या रसाचे सेवन केल्यामुळे शरीरातील हानिकारक पदार्थ बाहेर पडून जातात. चला तर जाणून घेऊया कोकम चीया सीड्स ज्युस बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य:

चिया सीड्स
कोकम सरबत
जिरा पावडर
लिंबाचा रस
रोझ सिरप
द्राक्ष किंवा इतर फळे

कृती:



कोकम चीया सीड्स ज्युस बनवण्यासाठी सर्वप्रथम, वाटीमध्ये पाणी घेऊन त्यात १ किंवा २ चमचा चिया सीड्स भिजत ठेवा.

त्यानंतर काचेच्या ग्लासमध्ये कोकम सरबत घेऊन त्यात चवीनुसार जिऱ्याची पावडर, लिंबाचा रस आणि चिमूटभर मीठ टाकून मिक्स करून घ्या.

नंतर त्यात रोझ सिरप टाका. १ तास भिजवून घेतलेले चिया सीड्स रोझ सिरपमध्ये टाकून मिक्स करा.

सगळ्यात शेवटी त्यात सोडा टाकून तुमच्या आवडीचे कोणतेही फळ टाकून मिक्स करून घ्या.


तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेले कोकम चीया सीड्स ज्युस.

# पीठ आंबवण्याची गरज नाही, सकाळच्या नाश्त्याला झटपट बनवा बेसनाचे अप्पे; १५ मिनिटांची रेसिपी

सकाळचा नाश्ता आपल्या आरोग्यासाठी फार गरजेचा असतो ज्यामुळे तो कधीही टाळू नये. मात्र बऱ्याचदा असे होते की, आपण उशिरा उठलो किंवा कामाच्या व्यापामुळे चांगला नाश्ता तयार करण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही. यामुळेच आज आम्ही तुमच्यासाठी सकाळच्या नाश्ताची एक चविष्ट पण झटपट अशी रेसिपी घेऊन आलो आहोत. ही रेसिपी अवघ्या काही मिनिटांतच बनून तयार होते.

रव्यापासून किंवा तांदळाच्या पिठापासून बनवलेले अप्पे जवळपास सर्वांनीच खाल्ले असतील. पण आज तुम्ही बेसनापासून बनवलेले हेल्दी आणि चविष्ट अप्पे बनवू शकता जे अधिक पौष्टिक बनते कारण त्यात भरपूर भाज्या असतात. तुम्ही सकाळच्या नाश्त्यासाठी सोपी आणि झटपट रेसिपी शोधत असाल तर आजची ही रेसिपी तुमच्यासाठी एक उत्तम पर्याय आहे. चला तर मग जाणून घेऊयात यासाठी लागणारे साहित्य आणि कृती.





साहित्य

१०० ग्रॅम बारीक चिरलेली कोबी
बारीक चिरलेला कांदा
सिमला मिरची
कोथिंबीर
१ कप बेसन
४ ते ५ चिरलेल्या हिरव्या मिरच्या
१ टेबलस्पून ओवा
अर्धा चमचा हिंग
दही
हळद
मीठ
तेल

कृती

बेसनाचे अप्पे तयार करण्यासाठी सर्वप्रथम सर्व साहित्य एकत्र करा

पिठात कमी पाणी घाला कारण कोबी पाणी सोडते

आता यात मीठ, एनो,किंवा चिमूटभर सोडा घाला आणि मिश्रणात मिक्स करा

आता अप्प्यांचे साचे घ्या आणि त्याला तेल लावा प्रत्येक साच्यात एक चमचा पिठ घाला

आवश्यकतेपेक्षा जास्त पिठ घालू नका अन्यथा ते शिजू शकते आणि पे साचा ओव्हरफ्लो होऊ शकते

मंद आचेवर पाच ते सात मिनिटे आपे शिजवून घ्या

दोन्ही बाजूंनी अप्पे छान शिजवून घ्या आणि मग चमच्याच्या मदतीने त्यांना साच्यातून बाहेर काढा

तयार अप्पे एका प्लेटमध्ये काढा आणि नारळाच्या चटणीबरोबर खाण्यासाठी सर्व्ह करा

# १३०० फूट खाली वसलंय हे अंडरग्राउंड हॉटेल, इथे मिळतो एका वेगळ्याच जगाचा अनुभव

फिरणे हे आपल्या आरोग्यासाठी फायद्याचे ठरते. रोजच्या कामाच्या व्यापातून आपण कुटुंबासोबत फिरण्याचा प्लॅन बनवतो. आता आपण कुठेही फिरायला गेलो तरी सर्वात पहिली गोष्ट आपल्या मनात येते ती म्हणजे एक चांगले हॉटेल. हॉटेलबाबतीत प्रत्येकाची आवड वेगळी असू शकते. काही लोकांना वेगवेगळ्या प्रकारच्या हॉटेल्समध्ये राहायचे असते. काही लोकांना उंच इमारती असलेली हॉटेल्स आवडतात, तर काहींना घरे किंवा राजवाडे आवडतात.



आजकाल एक अनोखे हॉटेल चर्चेत आहे जे जमिनीपासून १३०० फूट खाली आहे. हे जगातील सर्वात खोल अंडरग्राउंड हॉटेल म्हणून ओळखले जाते. या हॉटेलचे नाव डीप स्लीप आहे. हे हॉटेल वेल्सच्या स्नोडोनिया पर्वतांच्या मधोमध एका गुहेत बांधले आहे. येथे राहणारे लोक गुहेच्या ४१९ मीटर खाली बांधलेल्या खोल्यांमध्ये झोपतात. हॉटेलच्या आतील रचना इतकी सुंदर आहे की लोकांना झोप आली तरी कंटाळा येत नाही. आज आपण या लेखात या हॉटेलमध्ये इतर हॉटेलच्या तुलनेत नक्की काय वेगळे आहे ते जाणून घेणार आहोत. कुठे आहे हे हॉटेल?

डीप स्लीप हॉटेल स्वीडनमधील एका छोट्या शहरात वसले आहे, हे हॉटेल त्याच्या नैसर्गिक सौंदर्यासाठी आणि खनन इतिहासासाठी ओळखले जाते. हे हॉटेल जुन्या खाणीत बांधले गेले आहे, जे एकेकाळी चांदी आणि इतर मौल्यवान धातूंसाठी प्रसिद्ध होते. या खाणीचे नंतर पर्यटन स्थळात रूपांतर झाले आणि आता जगभरातून साहसप्रेमी येथे येतात. हॉटेलपर्यंत पोहोचण्यासाठी पाहुण्यांना विशेष लिफ्ट वापरावी लागते, जी त्यांना जमिनीखाली १३०० फूट खोलीपर्यंत घेऊन जाते.

हॉटेलची खासियत

डीप स्लीप हॉटेलचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे ते पूर्णपणे जमिनीच्या आत स्थित आहे. येथील खोल्या खडकात कोरलेल्या असून आधुनिक सुविधांनी सुसज्ज आहेत. हॉटेलच्या खोल्या अतिशय शांत आणि आरामदायी आहेत, जे पाहुण्यांना वेगळ्या जगाचा अनुभव देतात. हॉटेलमध्ये वीज, हीटिंग आणि वाय–फाय सारख्या सर्व आधुनिक सुविधा आहेत, परंतु येथील वातावरण पूर्णपणे नैसर्गिक आणि शांत आहे.

हॉटेलमध्ये राहणाऱ्या पाहुण्यांना अंडरग्राउंड एडवेंचरचा पुरेपूर आनंद लुटता येतो. इथल्या खोल्यांमधून बाहेर पडताच तुम्हाला प्राचीन खाणींचे मार्ग आणि खडकांचे नैसर्गिक सौंदर्य पाहायला मिळते. हॉटेलच्या आजूबाजूला अनेक गुहा आणि बोगदे आहेत, जे एक्सप्लोर करणे हा एक रोमांचक अनुभव असू शकतो. याव्यतिरिक्त, हॉटेलमध्ये एक अंडरग्राउंड रेस्टॉरंट देखील आहे जेथे पाहुणे स्वीडिश पाककृतीचा आनंद घेऊ शकतात.

डीप स्लीप हॉटेलमध्ये राहण्याचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे येथील अंडरग्राउंड एडवेंचर. हॉटेल पाहुण्यांना खाणींच्या खोलवर उतरण्याची आणि प्राचीन बोगदे शोधण्याची संधी आहे. येथील मार्गदर्शक पाहुण्यांना खाणींचा इतिहास आणि त्यांच्या मनोरंजक कथा सांगतात.

याशिवाय हॉटेलमध्ये रॉक क्लाइंबिंग आणि केव्हिंग सारखे उपक्रमही आयोजित केले जातात, जे साहसप्रेमींसाठी खूप रोमांचक असू शकतात. इथे राहणाऱ्या लोकांना एका वेगळ्याच जगात आलेसे वाटते. हॉटेल जमिनीच्या आत खूप खोल असल्याने येथील वातावरण अतिशय शांत आणि नयनरम्य वाटते. इथल्या खोल्यांमध्ये राहिल्यावर निसर्गाच्या कुशीत आल्यासारखं वाटतं. हॉटेल पाहुण्यांना या ठिकाणच्या नैसर्गिक सौंदर्याचा आणि शांततेचा आनंद लुटण्याची पुरेपूर संधी उपलब्ध करून देत. ज्यांना नेहमीच्या हॉटेलहुन काही वेगळे आणि रोमांचक पाहायचे असेल किंवा अनुभव घ्यायचा असेल त्यांच्यासाठी हे हॉटेल एक उत्तम पर्याय आहे. जर तुम्हाला वेगळ्या जगाचा अनुभव घ्यायचा असेल आणि निसर्गाच्या जवळ जायचे असेल तर डीप स्लीप हॉटेल तुमच्यासाठी उत्तम पर्याय ठरू शकतो. येथे राहिल्याने तुम्हाला एक अविस्मरणीय अनुभव मिळेल, जो तुम्हाला आयुष्यभर लक्षात राहील. त्यामुळे पुढच्या वेळी तुम्ही कोणत्या अनोख्या आणि रोमांचक ठिकाणाला भेट देण्याचा विचार करत असाल, तर तुमच्या बकेट लिस्टमध्ये डीप स्लीप हॉटेलचा समावेश करायला विसरू नका.

# चिकन – अंड्यांनीही मिळत नाहीये ताकद? चुकीच्या पद्धतीने खात आहेत ९०% लोक प्रोटीन; योग्य पद्धतीने बनवाल मसल्स होतील मजबूत

शरीराची वाढ आणि हाडे मजबूत करण्यासाठी प्रथिनांची तातडीने आवश्यकता असते. बरेच लोक भरपूर प्रथिनेयुक्त पदार्थ खातात पण तरीही ते अशक्त आणि आजारी राहतात. याचे एक प्रमुख कारण प्रथिनांचे चुकीचे सेवन असू शकते. शरीराच्या योग्य कार्यासाठी प्रथिने अत्यंत महत्वाची आहेत हे लक्षात ठेवा. हे स्नायूंना ताकद देते, हाडे मजबूत करते आणि त्वचा आणि केसांचे आरोग्य सुधारते. याशिवाय, शरीराच्या प्रत्येक भागाला सुरळीतपणे काम करण्यासाठी प्रथिनांची आवश्यकता असते.





पोषणतज्ज्ञ आणि आहारतज्ज्ञ शिखा अग्रवाल शर्मा यांच्या मते, बहुतेक लोक, असे गृहीत धरूया की ९० टक्के लोक प्रथिनेयुक्त पदार्थ चुकीच्या पद्धतीने खात आहेत. जर तुम्ही आवश्यक प्रमाणात प्रथिने घेत असाल पण तरीही तुमचे स्नायू कमकुवत असतील तर तुम्ही काही गोष्टींकडे लक्ष दिले पाहिजे. प्रथिने घेण्याची योग्य पद्धत कोणती आहे, प्रथिने पचवण्याची पद्धत कोणती आहे हे तुम्हाला माहीत असली पाहिजे.

प्रोटीनची आवश्यकता का आहे

शरीरातील प्रथिनांची कमतरता पूर्ण करण्यासाठी, प्रथिनयुक्त अन्न खाणे आवश्यक आहे. ते शाकाहारी आणि मांसाहारी दोन्ही आहारात आढळते. साधारणपणे, महिलांना दररोज ४६ ग्रॅम आणि पुरुषांना ५६ ग्रॅम प्रथिने आवश्यक असतात. जर प्रथिने योग्यरित्या पचली नाहीत तर त्यामुळे शरीरात पोट फुगणे किंवा बद्धकोष्ठता यासारख्या समस्या उद्भवू शकतात. म्हणून, ते योग्यरित्या पचवण्यासाठी आणि शरीराला मजबूत बनवण्यासाठी, काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत.

२०% प्रोटीनने करा सुरूवात

प्रथिने म्हणजे तुम्ही फक्त प्रथिनेयुक्त पदार्थ खाणे सुरू करा असे नाही. शरीराला ते पचवायला थोडे कठीण असते, म्हणून तुमच्या आहारात फक्त २०% प्रथिने असावीत. तसंच जेवण्यापूर्वी अर्धा तास तुम्ही प्रोबायटिक खावेत. प्रथिने पचवण्यासाठी पचनसंस्थेला जास्त मेहनत घ्यावी लागते. म्हणून, दहीसारखे प्रोबायोटिक पदार्थ जेवणाच्या अर्धा तास आधी सेवन केल्याने पचन प्रक्रिया सुलभ होते.

दुपारच्या जेवणात अधिक प्रोटीन

बरेच लोक रात्रीच्या जेवणात मांस, चिकन किंवा अंडी यांसारखे जड प्रथिनेयुक्त पदार्थ खातात, ज्यामुळे ते पचण्यास कठीण होतात. तुमच्या दुपारच्या जेवणात हे पदार्थ समाविष्ट करा जेणेकरून तुमच्या शरीराला ते पचवण्यासाठी पुरेसा वेळ मिळेल. तुम्हाला प्रोटीनची कमतरता भरून काढायची असेल तर जेवणात मांसाहारी पदार्थ हे दुपारच्या वेळी खावेत. रात्रीच्या वेळी खाल्ल्याने पचन होणे कठीण होते.

हलके अन्न खा

अन्न शक्य तितके हलके आणि चांगले शिजवलेले खावे. जेणेकरून पचनसंस्थेला ते सहज पचता येईल. कमी शिजलेले किंवा कडक अन्न पचायला जास्त वेळ लागतो आणि त्यामुळे अनेक आरोग्य समस्या उद्भवू शकतात. हलके अन्न खाल्ल्याने वजन नियंत्रणात राहण्यास, चांगली झोप लागण्यास आणि शरीरावर चरबी न वाढू देण्यास मदत मिळते. त्यामुळे रोजच्या आहारात घरचे हलके आणि कमी मसालेदार अन्नपदार्थ खावेत

प्रोटीनयुक्त भिजवलेले अन्न

जर तुम्ही मसूर, चणे किंवा चणे यांसारखे वनस्पती–आधारित प्रोटीन खात असाल तर ते शिजवण्यापूर्वी रात्रभर पाण्यात भिजवा. तसेच, ते शिजवताना, तूप, जिरे आणि हिंग सारखे मसाले घाला, जे पचनास मदत करतात. रोज सकाळी नाश्त्यामध्ये उकडलेले कडधान्य खाणे उत्तम प्रोटीन मिळवून देते तसंच यात फायबर असल्याने पोट अधिक काळ भरलेले राहते आणि तुमच्या शरीराला दीर्घकाळ एनर्जी मिळते.

# मुलांच्या ‘या’ सवयी वाढवतात मधुमेहाचा धोका, बालपणीच सुधारल्या तर आयुष्यभर रहाल निरोगी

आजच्या काळात मधुमेह ही एक गंभीर समस्या बनली आहे. हा एक आजार आहे जो सध्याच्या जगात झपाट्याने वाढत चालला आहे. याचा परिणाम केवळ प्रौढांवरच होत नाही तर मुलांमध्येही झपाट्याने वाढत असल्याचे दिसून आले आहे. मधुमेहाचे दोन प्रकार आहेत – टाइप १ आणि टाइप २. टाइप १ मधुमेह सहसा अनुवांशिक कारणांमुळे होतो, परंतु जीवनशैली आणि चुकीच्या खाण्याच्या सवयींमुळे टाइप २ मधुमेह होऊ शकतो. मधुमेहाचा धोका वाढण्याची अनेक कारणे असू शकतात. मात्र आज आपण या लेखात अशा काही कारणांविषयी जाणून घेणार आहोत ज्यामुळे सहसा लहान मुलांमध्ये मधुमेहाचा धोका वाढण्याची जास्त शक्यता असते. चला तर मग याविषयी सविस्तर जाणून घेऊयात. चुकीचा आहार चुकीचा आहार हे लहान मुलांमध्ये मधुमेहाचे एक महत्त्वाचे कारण आहे. आजकाल मुलं जंक फूड, फास्ट फूड, चिप्स, कोल्ड्रिंक्स आणि गोड स्नॅक्स जास्त खातात. या पदार्थांमध्ये साखर, मीठ आणि अस्वास्थ्यकर चरबीचे प्रमाण जास्त असते, ज्यामुळे शरीरातील इन्सुलिन प्रतिरोधक क्षमता वाढते आणि यामुळे मधुमेह होण्याच्या शक्यतेत वाढ होते. शारीरिक हालचालीत कमतरता आधुनिक जीवनशैलीत मुले टीव्ही, मोबाइल आणि व्हिडिओ गेम्समध्ये जास्त वेळ घालवतात. त्यामुळे त्यांची शारीरिक हालचाल कमी होते. शारीरिक हालचालींच्या अभावामुळे लठ्ठपणा वाढतो, जो टाइप–२ मधुमेहाचा धोका वाढवण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतो. लठ्ठपणा लठ्ठपणा हे लहान मुलांमध्ये मधुमेहाचे महत्त्वाचे कारण आहे. हाय कॅलरीज डाएट आणि फिजिकल क्टिव्हिटीजच्या अभावामुळे मुलांचे वजन वाढते. लठ्ठपणामुळे शरीरातील इन्सुलिन रेजिस्टेंस क्षमता वाढते, ज्यामुळे रक्तातील साखर वाढू शकते. जास्त गोड खाणे मुलांना गोड पदार्थ खायला फार आवडतात, पण चॉकलेट, कँडी, मिठाई आणि साखरेने भरलेले पेय जास्त प्रमाणात प्यायल्याने त्यांच्या शरीरातील साखरेची झपाट्याने पातळी वाढू शकते. या सवयीमुळे मुलांमध्ये मधुमेहाचा धोका वाढू शकतो. झोपेची कमतरता झोपेच्या कमतरतेमुळेही मुलांमध्ये मधुमेह होऊ शकतो. पुरेशी झोप न मिळाल्याने शरीरातील मेटाबॉलिजमवर परिणाम होतो आणि इन्सुलिनची सेंसिटिविटी कमी होते.

# स्वानंद सार्वजनिक वाचनालय चालते- बोलते विद्यापीठ - अर्जून बचुटे

केज/प्रतिनिधी सानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता. केज. जि. बीड. हे चालते - बोलते विद्यापीठ असल्याचे प्रतिपादन अर्जून बचुटे( मुंबई) यांनी प्रतिपादन केले. ते स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता. केज. जि. बीडआयोजित दिनांक १२ फेब्रुवारी २०२५ रोजी संत रोहिदास महाराज जयंती निमित्त व्याख्यान देताना बोलत होते. माझ्या पाहण्यात महाराष्ट्रातील एक दर्जेदार व लोकाभिमुख ग्रंथालय म्हणून स्वानंद सार्वजनिक वाचनालय आनंदगांव ता. केज. जि. बीड हे आहे, ग्रंथालयीन सेवा, दैनंदिन कार्य, निटनेटकेपणा, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, ग्रंथालयाचे वाचकांशी व वायकांचे ग्रंथालयाशी असेले घनिष्ठ नाते, वाचकांना देत असलेल्या सेवा,१ लाख ९ हजार ७०० असा ग्रंथसाठा १६ दैनिके, ५२ नियतकालिके व सर्व प्रकारचे सर्व घटकांना सामावून घेणारी ग्रंथसंपदा, वालकांनी




ओथंबून वाहणारे ग्रंथालय पाहून स्वानंद सार्वजनिक वाचनालय हे चालते - बोलते विद्यापीठ आहे असे प्रतिपादन अर्जून बचुटे, मुंबई यांनी प्रतिपादन केले. ग्रंथालयाच्या वतीने ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक, माजी प्राचार्य, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक वसुदेव( बप्पा ) गायकवाड यांच्या हस्ते व वाचकांच्या हस्ते शाल - पुष्पहार देवून त्यांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे आण्णासाहेब गायकवाड, सुधीर गायकवाड, व्यंकटी घोगले, बिभिषण गायकवाड, नागोराव वैरागे, बबन पुंड, रावसाहेब गायकवाड, विद्याधर गायकवाड, महादेव गायकवाड महेश गायकवाड यांनीही थोडक्यात मनोगत व्यक्त केले. वसुदेव( बप्पा) गायकवाड यांनी संत रोहीदास यांचे जीवन - कार्य यावर प्रकाश टाकत अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बबन पुंड यांनी केले, सुत्रसंचलन प्रकाश गायकवाड यांनी केले तर आभार नागेश्वर वैरागे यांनी केले. कार्यक्रमाला वाचक, हितचिंतक यांची उपस्थिती होती

# मेरी पॉलिसी मेरे हाथ या उपक्रमा अंतर्गत शेतकऱ्यांना पिक विमा पॉलिसीचे वितरण

केज/प्रतिनिधी मेरी पॉलिसी मेरे हाथ या उपक्रमा अंतर्गत शेतकऱ्यांना पिक विमा पॉलिसीचे वितरण तालुका कृषी कार्यालय केज येथे कृषी अधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले आहे. याबाबतच सविस्तर माहिती अशी की, मेरी पॉलिसी मेरे हाथ या उपक्रमांतर्गत प्रधानमंत्री फसल विमा योजना रब्बी हंगाम २०२४-२५ अंतर्गत ज्या शेतकऱ्यांनी बँकेमार्फत विमा पॉलिसी घेतलेली आहे. अशा शेतकऱ्यांना भारतीय कृषी विमा कंपनी लिमिटेड एआयसी मार्फत विमा पॉलिसी वाटपाचा उपक्रम केज तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी सुरू करण्यात आला आहे. त्याच अनुषंगाने दिनांक १२ फेब्रुवारी २०२५ रोजी केज तालुक्यातील कळंमआंबा व धोत्रा या दोन गावच्या शेतकऱ्यांना पीक विमा पॉलिसी कृषी कार्यालय केज येथे कृषी अधिकारी यांच्या हस्ते पीक विमा धारक शेतकऱ्यांना पॉलिसीचे वितरण करण्यात आले आहे. यावेळी एआयसी कंपनीचे तालुका प्रतिनिधी राहुल चौरे, एकनाथ शिंदे, काशिनाथ सामसे,







राम तारळकर यांच्यासह शेतकरी बांधव उपस्थित होते.

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेत रामानुजन यांची दिली माहिती



केज/प्रतिनिधी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी केंद्र लव्हुरी ता.केज शाळेत रामानुजन यांच्या प्रतिमेस राजाभाऊ दत्तात्रय कदम अपग्रेड मुख्याध्यापक जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी केंद्र लव्हुरी यांनी पुष्पहार अर्पण करून पुजन केले. रामानुजन यांचा जन्म दि.२२ डिसेंबर १८८७ रोजी भारतातील तामिळनाडूच्या कोइम्बतुर मधील इरोड गावात झाला. वडील श्रीनिवास अय्यंगर व आईचे नावाने कोमल हे होते.त्यांना गणित व इंग्रजी विषयाची जास्त प्रमाणात आवड होती.ते इ.७ वी वर्गात असताना पदवीच्या मुलांना गणित शिकवत असत.अशी माहिती देण्यात आली.या शाळेतील शिक्षक भारत बाबुराव हांगे सर, बाळासाहेब भिल्लु राठोड सर, आदर्श शिक्षिका श्रीमती गिताताई जीवराज अंडील मॅडम, श्रीमती सोनाली भारतराव भुमकर मॅडम यांनी सखोल माहिती दिली.

# दीड वर्षापासून फरार असलेल्या आरोपीला पोलीस ठाणे गांधी चौक च्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने केले अटक.

लातूर :- दीड वर्षापासून फरार असलेल्या फसवणूकीच्या गुन्ह्यातील आरोपीला पोलीस ठाणे गांधी चौक च्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने केले अटक.

याबाबत थोडक्यात माहिती की, पोलीस ठाणे विवेकानंद चौक, लातूर येथे दि.१७/०१/२०२४ रोजी लातूर शहरातील एका सुपर स्पेशलिटी हॉस्पीटल चे चालक डॉक्टरांनी तक्रार दिली की, दि.२६/०६/२०२३ रोजी त्यांनी त्यांचे सुपर स्पेशलिटी हॉस्पीटल मधील १०,४४,०००/- रुपयाचे उपकरणे दुरुस्ती करीता इसम नामे संतोष मुरादे रा.ओमकार हाईट्स फलेट नं. ३४ बसस्टैंड, बीड याला दिली होती. परंतु त्यांनी सदर उपकरणे परत न करता परस्परपणे विल्हेवाट लावली.

सदर तक्रारी वरून नमूद आरोपी विरुध्द पोलीस ठाणे विवेकानंद चौक येथे गुरनं ३१/२०२४ कलम ४०६ भादवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हा दाखल होताच नमूद गुन्हयातील आरोपी त्याचे राहते पत्त्यावरून निघून गेला. तेव्हा




पासून तो नेहमी त्याचे राहण्याचे ठिकाणे बदलत असल्याने पोलिसांच्या हाती लागत नव्हता. पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी लातूर शहर रणजीत सावंत यांच्या मार्गदर्शनात पोलीस पथक नमूद आरोपीचा विविध मार्गाने शोध घेत होते. दरम्यान पोलीस ठाणे गांधी चौक चे पोलीस निरीक्षक साहेबराव नरवाडे यांच्या नेतृत्वातील पोलीस पथकाला नमूद गुन्ह्यातील फरार आरोपी अहिल्यादेवी नगर जिल्ह्यात राहत असल्याची माहिती मिळाली. त्यावरून पोलीस ठाणे गांधी चौक चे सहाय्यक पोलीस निरीक्षक सदानंद भुजबळ, पोलीस उपनिरीक्षक आक्रम मोमीन यांचे पथकातील पोलीस अमलदार राजेंद्र टेकाळे, प्रकाश भोसले, शिवा पाटील, संतोष गिरी, शैलेश सुडे (सायबर सेल) हे आरोपीचा शोध कामी तात्काळ अहिल्यादेवी नगर जिल्ह्यामध्ये रवाना होऊन दि.११/०२/२०२५ रोजी अहिल्यादेवी नगर येथील पवन नगर येथून ताब्यात घेतले व पुढील तपासकामी पोलीस ठाणे विवेकानंद चौक,लातूर येथे हजर करण्यात आले आहे. गुन्ह्याचा पुढील तपास विवेकानंद चौक पोलीस करीत आहेत.

# माय बापाला लेकी गोड, झाल्या भावाला बहिणी जड.

## लोकगीतातून व्यक्त झाल्या कौटुंबिक व्यथा

देवणी/ प्रतिनिधी :- माय बापाला लेकी गोड, झाल्या भावाला बहिणी जड. अशा लोकगीतामधून बदलत्या समाज व्यवस्थेतील दुरावलेल्या नात्याचे मार्मिक वास्तव 'जागरण' या लोककलेतून व्यक्त झाले. कै. रसिका महाविद्यालय, देवणी येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आंबेगाव ता. देवणी येथे आयोजित केलेल्या 'जागर खंडोबाचा' या कार्यक्रमामध्ये वाघ्या मुरळी यांनी अनेक लोकगीतांचे सादरीकरण करून रसिकांना मंत्रमुग्ध केले. सामाजिक आशय, आध्यात्मिक भक्तिभाव, महापुरुषांचे चरित्र, कौटुंबिक नातेसंबंध, गुरुभक्ती महात्म्य अशा विविध विषयावर लोकसंगीत, नृत्य, व अभिनयाच्याद्वारे लोकगीतांचे सादरीकरण केले.

मराठी माणसांचे मन, मनगट व मर्दानी व्यक्तिमत्त्व ज्या गीतातून व्यक्त होते ते गीत म्हणजे पोवाडा. रायगड किल्ला महाराष्ट्राची शान आहे. या पोवाड्याचे वीररसात्मक बहारदार असे सादरीकरण केले. जिवलगा मल्हारी मल्हारी, राजसा मल्हारी मल्हारी, तुझ्याविना देवा सुनी सुनी, सोन्याची जेजुरी. या गीतामधून जेजुरी या तीर्थक्षेत्राबद्दल भक्तांच्या मनातील भक्तीभाव व्यक्त झाले. गड जेजुरीला उधळीतो भंडार, खंडेरायाचा




सोन्यावानी देवाचा दरबार या गीतामधून जेजुरीचे महात्म्य आणि सोनेरी वैभव अस्सलपणे व्यक्त झाले. संगती घेऊन रं मुरळीला न् वाघ्या चालला जेजुरीला. जेजुरीच्या खंडोबाचे भक्तीमहात्म्य आणि वाघ्या मुरळीच्या जीवनामध्ये खंडोबा देवाविषयी असणारे अनन्यसाधारण महत्त्व या गीतामधून व्यक्त झाले. या पंढरपुरात नामाला एकादस, दारी लावावी तुळस. असा आध्यात्मिक संदेश देणारी व तुळशीचे महात्म्य सांगणारी गीते सादर करून रसिकांवर भक्तीरसाचा वर्षाव केला. रत्नासारखी जतन केली, चिमणी माझी उडून गं उडून गेली, माझा दादा रडतो गं घरात पडून, माझी सोन्याची बाहुली मला चालली सोडून, माझी आई रडती पदराला धरून, काळजाचा तुकडा मला गेला सोडून. या गीतामधून माहेर सोडून सासरी जाताना आई, बाप व भावाला होणारे दुःख प्रकट झाले.

प्रत्येक माणसाला सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व अध्यात्मिक क्षेत्रात प्रगती करण्यासाठी गुरुचे महत्त्व अनन्यसाधारण आहे हे सांगणारे गीत, नाही रे किंमत तुझ्या थाटामाटाला, म्हणून पुन्हा जन्म घ्यावा गुरूच्या पोटाला. अशा शब्दातून गुरुभक्तीचे महात्म्य पटवून दिले.

या वाघ्या मुरळी कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यासाठी दिलीप वाघे बेवनाळवाडीकर, शामराव वाघे वलांडीकर, बबन वाघे खडकउमरगा, हैबत गायकवाड होनीहिप्परगा, सविता थोरात (मुरळी) इत्यादी लोककलावंत उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. गोपाल सोमाणी यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. प्रशांत भंडे यांनी केले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना सहकार्यक्रमाधिकारी प्रा. धनराज बिराजदार, प्रा. शुभम जाधव, श्री व्यंकट शिंदे, मुख्याध्यापक मुरलीधर बोडके, श्री बालाजी म्हेत्रे, श्री शंकर म्हेत्रे यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक विद्यार्थी, ग्रामस्थ व परिसरातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बाजारपेठेत टोमॅटोची दर घसरले, लागवडीचे खर्चही निघेना तर शेतकरी आर्थिक संकटात!

किनवट / शेख शौकत :- किनवट तालुक्याच्या बाजारपेठात टोमॅटोचा मागील काही दिवसापासून भाव कमी झाला आहे. बाजारातील आवक वाढल्यानंतर भाव पडले. सध्या बाजारात टोमॅटोला प्रतिकिलो दहा रूपये भाव मिळत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे अर्थकारण कोलमडले आहे. बाजारात नोव्हेंबरपर्यंत टोमॅटोला चांगला भाव मिळत होता, पण नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यापासून बाजारात घसरण व्हायला सुरुवात झाली. दरातील ही घसरण थांबायचे नाव घेईना. त्याचे महत्वाचे कारण म्हणजे बाजारातील आवक वाढली होती. नोव्हेंबरच्या आधीपर्यंत बाजारात आवक कमी होती. तर उठाव व किंमतीही चांगल्या मिळत होते. त्यामुळे बाजारात चांगला भाव मिळत होता. घाऊक बाजारात टोमॅटोची १० रुपये किलोने विक्री विशेष म्हणजे टोमॅटो लागवडीसाठी पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध होते. तसेच लागवडीच्या काळात भावही चांगले होते. त्यामुळे शेतकऱ्यांनी लागवडी वाढवल्या होत्या. परिणामी आता आवक वाढली. किरकोळ बाजारात दहा ते २० रूपये किलो प्रमाणे भाव मिळत आहे. हाच भाव अडीच महिन्याआधी ५० ते ६० रुपये किलो होता. बाजारात टमाटरच्या पुरवठा वाढला मात्र मागणी कायम आहे. त्यामुळे सध्या टोमॅटोचे भाव कमी होण्याला वाढलेला पुरवठा हे महत्वाचे कारण असल्याचे व्यापारी सांगत आहेत.बाजारातील टोमॅटोचे भाव पडल्याने शेतकरी चांगलेच अडचणीत आले असे दिसून येत आहे. टोमॅटोचा उत्पादन खर्च क्विंटलमागे १५०० रुपयांपर्यंत असल्याचे काही शेतकऱ्याला बोलताना सांगितले आहे. तर बाजारात सध्या एक क्विंटलची किंमत केवळ ५०० ते ६०० रुपयांच्या दरम्यान भाव मिळत आहे. सध्याचा भाव उत्पादन खर्चापेक्षा कमी असं शेतकऱ्यांनी सांगितले आहे. त्यामुळे शेतकरी सध्या चांगलेच अडचणीत आले आहे. टोमॅटोची आवक वाढल्याचा परिणाम दरावर दिसून येत आहे. लागवडी वाढल्याने आवकही वाढली आहे. बाजारातील टोमॅटोची आवक मार्चपर्यंत चांगली राहू शकते, असे काही शेतकऱ्यांनी सांगितले. तर बाजारातील व्यापारीही आवकेबाबत पुढील दोन महिने सकारात्मक दिसत आहेत.

# छत्रपती शिवाजी महाराज जंयतीच्या पार्श्वभुमीवर पोलीस अधीक्षक कार्यालय येथे शांतता कमिटी बैठक संपन्न.

लातूर :- लातूर जिल्ह्यामध्ये दि.१९ फेब्रुवारी २०२५ रोजी साजरी होणाऱ्या शिवजंयतीच्या अनुषंगाने जिल्हयात सामाजिक सलोखा, शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी या दृष्टिने पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे यांचे अध्यक्षतेखाली आज दि.१२ फेब्रुवारी रोजी पोलीस अधीक्षक कार्यालय,लातूर येथे लातूर शहरातील प्रमुख जयंती उत्सव मंडळ, सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समिती चे पदाधिकारी व सदस्य यांचे उपस्थितीत बैठक पार पडली.

सदर बैठकीस पोलीस उपाधीक्षक (गृह) गजानन भातलवंडे, उपविभागीय पोलीस अधिकारी (लातूर शहर) रणजीत सावंत, जिल्हा विशेष शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर तसेच शहरातील पाचही पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक सुधाकर देडे, दिलीप सागर, साहेबराव नरवाडे, पाटील, अरविंद पवार व पोलीस अधीक्षक कार्यालयातील इतर अधिकारी हजर होते. सदर बैठकीत जंयती मंडाळाचे अध्यक्ष व पदाधिकारी यांचे कडून उत्सव अनुषांगाने आयोजित कार्यक्रम व त्यांना येणाऱ्या समस्यां बाबत चर्चा करुन मार्गदर्शन करण्यात आले.

पोलीस प्रशानाकडून जिल्ह्यातील जयंती उत्सव मंडळ व नागरीकांना आवाहन.




श्री.सोमय मुंडे,यांनी आवाहन केले आहे की, सध्या इयत्ता १२ वी व इयत्ता १० वी विद्यार्थ्यांची परीक्षा चालु असुन आयोजित कार्यक्रमांमुळे त्यांच्या अभ्यासावर परिणाम होणार नाही याची जाणीव ठेवून कार्यक्रम साजरे करावते.तसेच ध्वनी प्रदुषण नियमांचे उल्लघंन होणार नाही याची दक्षता घ्यावी. जयंती उत्सव दरम्यान अचानक एखादा प्रश्न उपस्थित झाल्यास त्याची प्रशासनास माहिती द्यावी. मोटरसायकल रॅली मध्ये वाहतुक नियमांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी. शिवजयंती निमित्त आयोजित मिरवणुका ह्या ऊा/ डॉल्बी विरहीत, पारंपारीक वाद्याचा वापर करुन दिलेल्या मार्गानेच व नेमुण दिलेल्या वेळेच्या आत शांततेत पुर्ण करव्यात.

दरवर्षी प्रमाणे जयंती उत्सव विधायक कार्यक्रम करुन साजरा करण्यात येईल. उत्सव समिती, नागरीक व पोलीस यांचे समन्वयाने शिवजयंती उत्सव जिल्हाभरात उत्साहात व शांततेत पार पडेल अशी अपेक्षा पोलीस अधीक्षक यांनी व्यक्त केली.

सदर बैठकीस लातूर जिल्ह्यातील प्रतिष्ठित नागरिक,शांतता कमिटीचे सदस्य,शिवजयंती मंडळाचे अध्यक्ष, पदाधिकारी,राजकीय, सामाजिक क्षेत्रातील व्यक्ती, व्यापारी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE